# प्रेम

## प्रेम विश्वव्यापी असते

जीवन आणि प्रेम यांचे एकमेकांशी अतूट नाते आहे. जेथे जीवन आहे तेथे प्रेम असलेच पाहिजे. अत्यंत प्रारंभिक अवस्थेत असलेली जाणीवसुद्धा स्वतःच्या बंधनांचा भेद करून इतर साकार रूपांशी कोणत्या तरी प्रकारची एकात्मता साधण्याचा प्रयत्न करीत असते. जरी प्रत्येक साकार रूप हे इतर साकार रूपांपासून भिन्न असले, तरी प्रत्यक्षात ही सर्व जीवनाच्या एकाच एकात्म तत्त्वाची साकार रूपे होत. एका साकार रूपाला दुसऱ्या साकार रूपाबद्दल जे आकर्षण दिसून येते त्या आकर्षणाद्वारे, अंतर्यामी सुप्तपणे दडून राहिलेले सत्य अगदी मायेच्या जगतातदेखील स्वतःची अप्रत्यक्षपणे जाणीव करून देत असते.

## अचेतन सृष्टीतील प्रेम

सर्व ग्रह व तारे ज्याच्या नियंत्रणाखाली असतात तो गुरुत्वाकर्षणाचा नियमसुद्धा, त्याच्या दृष्टीने पाहिल्यास, विश्वसृष्टीच्या प्रत्येक भागाला व्यापून राहणाऱ्या प्रेमाचे अंधुक प्रतिबिंब होय. वस्तुतः प्रतिसारक शक्ती यादेखील प्रेमाची बाह्य प्रगट रूपेच होत, कारण पदार्थ एकमेकांपासून दूर फेकले जातात ते इतर कोणत्या तरी पदार्थांकडे अधिक जोराने आकर्षित होत असल्यामुळेच. पदार्थांच्या मूळ संरचनेतच संयोगाच्या व आकर्षणाच्या ज्या शक्ती वास करत असतात, त्या प्रेमाच्या सकारात्मक अभिव्यक्ती होत. प्रतिसारण-क्रिया ही सकारात्मक आकर्षणशक्तीचा नकारात्मक परिणाम होय. या स्तरावरील डोळ्यांत भरणारे उदाहरण म्हणजे लोखंडावर प्रभाव

गाजवणारी चुंबकाच्या ठिकाणची आकर्षणशक्ती. प्रेमाची ही सर्व रूपे कनिष्ठतम दर्जाची होत, कारण ती प्रारंभिक अवस्थेतील ज्या जाणिवेच्या स्वरूपात प्रगट होतात त्या जाणिवेतच ती स्वाभाविकपणे बंदिस्त झालेली असतात.

**पशुयोनीतील प्रेमाचे स्वरूप**

पशुयोनीमध्ये प्रेम हे, आजूबाजूच्या विविध प्रकारच्या पदार्थांविषयी जाणीवपूर्वक निर्माण होणाऱ्या विकारांच्या स्वरूपात काहीसे अधिक स्पष्टतेने व्यक्त होते. हे प्रेम म्हणजे उपजतबुद्धीचा प्रकार असून, हवे असलेले पदार्थ हस्तगत करून त्यांच्या द्वारे विविध विकारांची तृप्ती घडवून आणण्याच्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्यावेळी वाघ हरणाला फाडून खाऊ पाहतो, त्यावेळी तो अगदी खऱ्या अर्थाने त्या हरणाच्या प्रेमात पडलेला असतो. लैंगिक आकर्षण हे या स्तरावरील प्रेमाचे आणखी एक रूप होय. या स्तरावर प्रेमाचे जे जे आविष्कार आढळून येतात त्या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आढळून येते, ती म्हणजे ते सर्व आपल्या प्रेमाच्या वस्तूच्या द्वारे कोणता ना कोणता शारीरिक विकार वा वासना तृप्त करून घेण्याच्या मागे असतात.

**मानवी प्रेमाचा तर्कबुद्धीशी सुसंवाद आवश्यक**

मानवी प्रेम हे प्रेमाच्या या सर्व प्रकारच्या कनिष्ठ दर्जाच्या रूपांपेक्षा अधिक श्रेष्ठ प्रतीचे असते, कारण मनुष्यप्राण्याच्या ठायी जाणीव ही पूर्णपणे विकसित झालेली असते. मानवी प्रेम हे मानवी योनीपेक्षा कनिष्ठ योनीतील प्रेमाच्या रूपांच्या बरोबरीने सतत अस्तित्वात असले, तरी एका दृष्टीने ते त्यांच्यापेक्षा भिन्न असते; कारण येथून पुढे त्याला आपली सर्व कार्ये आणखी एका नवीन घटकाला बरोबर घेऊन पार पाडावी लागतात; तो घटक तर्कबुद्धी हा होय. कधी कधी मानवी प्रेम हे अशा प्रकारची शक्ती म्हणून स्वतःला प्रगट करते की, जी तर्कबुद्धीशी फारकत घेऊन व त्याला समांतर राहून कार्य करते. याउलट कधी कधी ते अशा प्रकारची शक्ती म्हणून स्वतःला प्रगट करते की जी तर्कबुद्धीत मिसळून जाऊन तिच्याशी संघर्ष निर्माण करते. सरतेशेवटी, ते अशा एका सुसंवादी समग्रतेचा घटक म्हणून स्वतःला प्रगट करते की ज्यामध्ये प्रेम व तर्कबुद्धी यांचा समतोल साधला जाऊन दोन्ही एकात्म अशा संयोगात विरून जातात.

## प्रेम व तर्कबुद्धी यांची तीन संयुक्त रूपे

अशा रीतीने मानवी प्रेम तर्कबुद्धीबरोबर तीन प्रकारची संयुक्त रूपे साधू शकते. पहिल्या प्रकारात, विचाराचे क्षेत्र व प्रेमाचे क्षेत्र ही दोन्ही क्षेत्रे एकमेकांपासून जास्तीत जास्त अलग असतात, म्हणजे प्रेमाच्या क्षेत्रापर्यंत पोहोचणे वैचारिक कार्यपद्धतीला अशक्यप्राय होते, तर प्रेमाला वैचारिक विषयांपर्यंत पोचावयास फारच थोडी संधी मिळते, किंवा मुळीच संधी मिळत नाही. आत्म्याच्या या दोन अंगांचे पूर्ण विभाजन हे अर्थातच कधीच शक्य नसते, परंतु जेव्हा प्रेम व तर्कबुद्धी यांचे कार्य आळीपाळीने चालते (म्हणजे एकदा प्रेम तर दुसऱ्यांदा तर्कबुद्धी याप्रमाणे दोन्ही आळीपाळीने वर्चस्व गाजवतात) तेव्हा आपल्या पदरात एक तर विवेकाने प्रकाशित न झालेले प्रेम तरी पडते, नाहीतर प्रेमाच्या चैतन्याचा अभाव असलेली रुक्ष व कोरडी तर्कबुद्धी तरी पडते. दुसऱ्या प्रकारामध्ये, प्रेम व तर्कबुद्धी दोन्हीही एकाच वेळी कार्यरत असतात, परंतु दोन्ही परस्परांशी सुसंवाद साधून कार्य करत नाहीत. जरी या संघर्षामुळे गोंधळ निर्माण होतो तरी तो [संघर्ष] म्हणजे, जाणिवेच्या ज्या उच्चतर अवस्थेत प्रेम व तर्कबुद्धी यांचा खरोखरीचा मिलाफ घडून येत असतो, त्या जाणिवेपर्यंतची उत्क्रांती घडून येण्यातील एक आवश्यक टप्पा होय. तिसऱ्या प्रकारच्या प्रेमामध्ये, प्रेम व तर्कबुद्धी यांचा मिलाफ ही प्रत्यक्षात घडून आलेली वस्तुस्थिती असते. परिणामी प्रेम व तर्कबुद्धी या दोहोंचेही इतक्या परिपूर्णतेने परिवर्तन घडून येते की, त्यातून एका अगदी नव्या स्तरावरील जाणिवेचा उदय होण्यास चालना मिळते – अशी जाणीव की सामान्य जाणिवेशी तुलना करता जिचे 'अति-मानवी' [दैवी] जाणीव असे यथार्थपणे वर्णन करावे लागेल.

## प्रेमातील गुणात्मक विविधता

मानवी मन हे असंख्य इच्छा-वासनांनी भरलेल्या 'अहं-जाणिवे'च्या मुशीतून (साच्यातून) बाहेर प्रगट होत असते. [मुशीतील] या घटकांमुळे प्रेमाला विविध रंगछटा प्राप्त होतात. ज्याप्रमाणे शोभादर्शकामध्ये (कॅलिडॉस्कोपमध्ये) अगदी साध्या पदार्थांच्या [काचेच्या तुकड्यांच्या] भिन्न भिन्न संयोगातून सतत बदलणाऱ्या विविधतापूर्ण नक्षी आपल्याला पहावयास मिळतात, त्याप्रमाणे, मानसिक घटकांच्या [इच्छा-वासनांच्या] अनोख्या संयोगांमुळे आपल्याला जवळजवळ अमर्याद अशी गुणात्मक विविधता प्रेमाच्या क्षेत्रातही आढळून येते; आणि ज्या प्रकारे विविध जातींच्या फुलांत

रंगांच्या अगणित छटा दिसून येतात, अगदी तशाच प्रकारे मानवी प्रेमातही वेगवेगळ्या तऱ्हांचे नाजूक फरक आढळून येतात.

## प्रेमाची कनिष्ठ रूपे

मानवी प्रेम हे मोह, काम, लोभ, क्रोध व मत्सर यांसारख्या विघ्ने आणणाऱ्या घटकांनी वेढले गेलेले असते. एका अर्थाने पाहिल्यास, हे विघ्नकारक घटकदेखील एकतर कनिष्ठ प्रतीच्या प्रेमाची रूपे तरी असतात, किंवा त्या रूपांचे अटळ असे अवांतर परिणाम असतात. मोह, काम व लोभ यांच्याकडे, प्रेमाची विकृत व कनिष्ठ दर्जाची रूपे म्हणून पाहता येईल. मोहासक्तीमध्ये माणसाला इंद्रियसुख देणाऱ्या विषयाची भुरळ पडलेली असते; कामवासनेमध्ये, त्या विषयापासून सुखसंवेदना भोगण्याची वखवख त्याच्या ठायी निर्माण होते; आणि लोभामध्ये त्या विषयाच्या प्राप्तीची तो इच्छा धरतो. कनिष्ठ प्रतीच्या प्रेमाच्या या तीन रूपांपैकी, लोभाचा मूळ वस्तूबरोबरच तिची प्राप्ती करून देणाऱ्या साधनांपर्यंत आपला प्रभाव वाढविण्याकडे कल असतो. अशा प्रकारे, तीव्र लालसा निर्माण करणाऱ्या विविध गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठी साधने म्हणून ज्यांचा उपयोग होऊ शकतो, त्या संपत्तीसाठी किंवा सत्तेसाठी किंवा कीर्तीसाठी माणसे लोलुप होतात. जेव्हा प्रेमाच्या या कनिष्ठ प्रतीच्या रूपांच्या मार्गात अडसर निर्माण केला जातो किंवा अडसर निर्माण होण्याची भीती निर्माण केली जाते, तेव्हा क्रोध व द्वेष जागृत होतात.

## प्रेमाची कनिष्ठ रूपे त्याच्या श्रेष्ठ रूपांचे शत्रू

प्रेमाची ही कनिष्ठ प्रतीची रूपे शुद्ध प्रेमाच्या प्रसाराला रोखून धरतात. जोपर्यंत प्रेमाचा प्रवाह त्याला मर्यादित व विकृत बनविणाऱ्या त्याच्या कनिष्ठ प्रतीच्या रूपांच्या गुंत्यातून मुक्त होत नाही, तोपर्यंत तो कधीही स्वच्छ व स्थिर होऊ शकत नाही. कनिष्ठ प्रतीचे प्रेम हे श्रेष्ठ दर्जाच्या प्रेमाचा शत्रू आहे. जाणीव जर कनिष्ठ प्रतीच्या प्रेमाच्या तालावर नाचू लागून त्यातच अडकून पडली, तर स्वतःच निर्माण केलेल्या खोड्यातून बाहेर पडून पुढील प्रगती करणे आपल्याला अवघड असल्याचे आढळून आल्यावर, ती त्या खोड्यातून स्वतःची सुटका करून घेऊ शकत नाही. अशा रीतीने कनिष्ठ दर्जाचे प्रेम हे श्रेष्ठ दर्जाच्या प्रेमाच्या विकासात व्यत्यय आणणे चालूच ठेवते, आणि म्हणूनच श्रेष्ठ दर्जाच्या प्रेमाच्या अनिर्बंध प्रगटीकरणाला वाव देण्यासाठी त्याचा त्याग करणे आवश्यक ठरते.

## प्रेम आणि मोह

सदसद्विवेकबुद्धीचा सतत वापर करणे हे कनिष्ठ प्रेमाच्या कवचातून [जाड आवरणातून] श्रेष्ठ प्रेमाचा उदय होण्यास साहाय्यक ठरते. म्हणूनच आपण प्रेमात व विघ्नकारक ठरणाऱ्या मोह, काम, लोभ व क्रोध यांच्यात काळजीपूर्वक फरक केला पाहिजे. मोहामध्ये, माणूस हा त्याला इंद्रिय-विषयाबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाच्या दडपणाचा निष्क्रिय बळी असतो. याउलट प्रेमामध्ये, प्रेम जडलेल्या वस्तूच्या आंतरिक मूल्याचे सक्रियपणे यथार्थ गुणग्रहण केलेले असते.

## प्रेम आणि कामवासना

प्रेम हे कामवासनेहूनदेखील भिन्न असते. कामवासनेमध्ये इंद्रिय-विषयांवर अवलंबून रहावे लागते, ज्यामुळे माणसाला आध्यात्मिक दृष्ट्या दुय्यम स्थान प्राप्त होते; याउलट प्रेम हे साकार रूपाच्या मागे असलेल्या सत्य - तत्त्वाशी [परमात्म-तत्त्वाशी] आत्म्याचा थेट व सुसंवादी संबंध घडवून आणते. त्यामुळे कामवासनेचा अनुभव जड स्वरूपाचा, तर प्रेमाचा अनुभव हलक्या स्वरूपाचा असतो. कामवासनेमध्ये जीवनाचा संकोच होतो, तर प्रेमात अस्तित्वाचा विस्तार होतो. एका जीवात्म्यावर प्रेम करणे म्हणजे त्याच्या जीवनाची आपल्या स्वतःच्या जीवनात भर टाकण्यासारखे असते. तसे केल्याने तुमच्या जीवनाची विशालता जणू काही बहुगुणित होते आणि तुम्ही प्रत्यक्षपणे दोन केंद्रांद्वारे आपले जीवन जगू लागता. जर तुम्ही सर्व जगावर प्रेम करत असाल, तर सबंध जगासंबंधीच्या आत्मसमर्पणाच्या भावनेमुळे तुमचे जीवन संपूर्ण जगाला व्यापून राहते, याउलट कामवासनेमध्ये जीवन संकोच पावू लागते आणि, ज्याला आपण स्वतःपासून 'परके' समजतो, त्या इंद्रिय-विषयावर अवलंबून असल्याची हताशपणाची सर्वसाधारण भावना बोचत राहते. अशा प्रकारे कामवासनेमध्ये [अलगपणाची] भावना व [त्यातून निर्माण होणाऱ्या] यातना यांचा तीव्र स्वरूपात अनुभव येतो; याउलट प्रेमामध्ये एकात्मतेचा व आनंदाचा प्रत्यय येतो. कामवासना म्हणजे [चेतनेचे] अधःपतन, तर प्रेम म्हणजे [चेतनेचे] पुनरुज्जीवन. कामवासना ही इंद्रियांची वखवख, तर प्रेम हा आत्म्याचा सहजाविष्कार. कामवासना आत्मतृप्तीच्या शोधात असते, तर प्रेम आत्मतृप्तीचा साक्षात अनुभव घेते. कामवासनेत [मनाची] तगमग होते, तर प्रेमात मनःशांती मिळते.

## प्रेम आणि लोभ

प्रेम हे लोभापासूनही तितकेच निराळे असते. लोभ म्हणजे स्थूल व सूक्ष्म अशा प्रकारच्या स्वरूपातील स्वामित्वाची किंवा मालकी हक्काची भावना. तो स्थूल वस्तू, माणसे इत्यादिकांनाच नव्हे, तर प्रत्यक्षात न दिसणाऱ्या व पकडून ठेवता न येणाऱ्या कीर्ती व सत्ता या गोष्टींनाही आपल्या वर्चस्वाखाली आणू पाहतो. प्रेमामध्ये तुमच्या व्यक्तिगत जीवनात दुसऱ्या माणसाला बळजबरीने सामील करून घेण्याचा प्रश्नच नसतो; ते [प्रेम] इतक्या मुक्तपणे व सर्जनशीलतेने प्रवाहित होत असते की ज्यामुळे, स्वतःकरिता कोणत्याही अपेक्षा न करताही, ते प्रियतमाच्या अस्तित्वाला चैतन्यमय व ताजेतवाने बनविते. अशा परिस्थितीत एक कूटप्रश्न निर्माण होतो -- ज्या लोभामुळे माणूस दुसऱ्या वस्तूला आपल्या ताब्यात आणू पाहतो त्याचा प्रत्यक्षात उलटा परिणाम होऊन, तो लोभ त्या माणसालाच त्या वस्तूच्या प्रभावाखाली आणतो. उलटपक्षी, ज्या प्रेमामुळे माणूस त्या वस्तूला आत्मसपर्मण करण्याचे उद्दिष्ट बाळगतो, ते प्रेम प्रियतमाचे [वस्तूचे] प्रियकराच्या [माणसाच्या] प्रत्यक्ष अस्तित्वातच विलीनीकरण घडवून आणते. लोभामध्ये अहंकार हा इंद्रिय-विषयाला स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न करतो, परंतु तो स्वतःच त्या इंद्रिय-विषयाच्या आधीन होतो. याउलट प्रेमामध्ये अहंकाराने प्रियतमाला [इंद्रिय-विषयाला] हातचे काहीही राखून न ठेवता आत्म-समर्पण केलेले असते; पण प्रत्यक्ष या कृतीतच त्याला आढळून येते, की आपण त्या प्रियतमाला स्वतःच्या अस्तित्वातच सामावून घेतलेले आहे.

## सद्गुरु-कृपेतून शुद्ध प्रेमाची जागृती

मोह, काम व लोभ यांच्यापासून आध्यात्मिक रोग उत्पन्न होतो, जो क्रोध व मत्सर यांच्या विकोपाला जाणाऱ्या लक्षणांमुळे, अधिकच उग्र स्वरूप धारण करतो. याच्या अगदी उलट, गुणभिन्नतेच्या दृष्टीने पाहता, शुद्ध प्रेम म्हणजे आध्यात्मिक परिपूर्णतेचा बहर होय. मानवी प्रेम हे बंधनयुक्त परिस्थितीच्या दावणीला इतके करकचून बांधले गेलेले असते की, त्यामुळे शुद्ध प्रेमाला अंतरंगातून उत्स्फूर्तपणे प्रगट होणे अशक्य होऊन बसते, आणि म्हणूनच साधकाच्या ठिकाणी जेव्हा शुद्ध प्रेमाची जागृती होते, तेव्हा ती सदैव देणगीच असते. सद्गुरु-कृपेच्या अवतरणाला प्रतिसाद म्हणून साधकाच्या अंतःकरणातही शुद्ध प्रेम जागृत होत असते. जेव्हा

पहिल्या प्रथम सद्गुरूकडून शुद्ध प्रेम देणगी म्हणून प्राप्त होते तेव्हा ते, सुपीक जमिनीत बी रुजावे त्याप्रमाणे, त्याच्या जाणिवेत रुजते आणि मग कालांतराने त्या बीजाचे प्रथम रोपट्यात व नंतर पूर्ण वाढलेल्या वृक्षात रूपांतर होते.

## सद्गुरु-कृपेसाठी लागणारी आध्यात्मिक पूर्वतयारी

तथापि,सद्गुरू-कृपेचे अवतरण हे साधकाच्या प्राथमिक स्वरूपाच्या आध्यात्मिक पूर्वतयारीवर अवलंबून असते. जोपर्यंत साधक आपल्या आध्यात्मिक मनोरचनेत काही दैवी गुण आत्मसात करून घेत नाही, तोपर्यंत ही प्रारंभिक स्वरूपाची आध्यात्मिक तयारी परिपूर्ण होऊ शकत नाही. जेव्हा एखादा मनुष्य अपरोक्ष परनिंदा टाळतो, दुसऱ्यांच्या अवगुणांऐवजी त्यांच्या गुणांबद्दल अधिक विचार करतो, तसेच जेव्हा तो श्रेष्ठ दर्जाची सहनशील वृत्ती आचरणात आणून दाखवू शकतो, आणि स्वतःच्या हिताचा बळी देऊनही परहिताचा विचार करतो, तेव्हा तो सद्गुरु-कृपा प्राप्त करून घेण्यास पात्र होतो. साधकाच्या या आध्यात्मिक पूर्वतयारीच्या मार्गातील सर्वात मोठ्या अडथळ्यांपैकी एक म्हणजे, चिंता करत बसणे हा होय. जेव्हा महत्प्रयासाने साधक या चिंतेच्या अडथळ्यावर मात करतो, तेव्हा ज्यांच्यामुळे साधकाची आध्यात्मिक पूर्वतयारी घडून येत असते, ते दैवी गुण अंगी बाणविण्यासाठीचा त्याचा मार्ग खुला होतो. साधकाची तयारी पूर्ण होताक्षणीच सद्गुरू-कृपेचा त्याच्यावर वर्षाव होतो, कारण दैवी प्रेमाचा महासागर असलेला तो सद्गुरू, त्याची कृपा ज्याच्यामध्ये सुफलित होईल, अशा जीवात्म्याच्या सदैव शोधात असतो.

## शुद्ध प्रेम अति-दुर्मिळच

सद्गुरूच्या कृपेमुळे ज्या प्रकारचे प्रेम निर्माण होते त्याची प्राप्ती म्हणजे एक विशेष प्रकारचा दुर्मिळ सन्मान होय. आपल्या अपत्याकरिता सर्वस्वाचा त्याग करण्यास किंवा मरण पत्करण्यास तयार असणारी माता काय, किंवा आपल्या देशाकरिता प्रत्यक्ष आपल्या प्राणांचीही कुर्वंडी करण्यास मागेपुढे न पाहणारा हुतात्मा काय, दोघेही खरोखर अत्यंत धन्य होत; पण त्यांनादेखील सद्गुरूंच्या प्रेमाद्वारे निर्माण होणाऱ्या शुद्ध प्रेमाची गोडी निःसंशयपणे चाखावयास मिळत नाही. इतकेच नव्हे, तर ज्यांनी डोंगर-गुहांत व गिरिकंदरांत मांडी घालून, गहन समाधीमध्ये आपली

पूर्णपणे ब्रह्मानंदी टाळी लावलेली आहे, अशा लांब दाढी वाढलेल्या श्रेष्ठ योग्यांनादेखील या मौलिक प्रेमाचा निश्चितपणे लाभ होतोच असे नाही.

## शुद्ध प्रेम हा सर्वश्रेष्ठ साधनमार्ग

सद्गुरु-कृपेतून जागृत होणारे प्रेम हे, साधक उपयोगात आणत असलेल्या इतर कोणत्याही प्रेरणादायी साधनमार्गापेक्षा अधिक मौलिक असते. या प्रेमाच्या ठिकाणी सर्व साधनमार्गांच्या गुणांचाच केवळ संयोग झालेला असतो असे नाही, तर साधकाला त्याच्या ध्येयाप्रत पोहोचविण्याच्या त्याच्या सामर्थ्यात ते या सर्वांपेक्षा [सर्व साधनमार्गांपेक्षा] सरस असते. जेव्हा या प्रेमाचा जन्म होतो तेव्हा साधकाच्या ठायी फक्त एकच एक इच्छा शिल्लक राहते -- आणि ती म्हणजे दैवी प्रियतमाशी एकरूप होण्याची. अशा प्रकारे जाणिवेचे इतर सर्व इच्छा-वासनांपासून अलिप्त होणे हे अमर्याद पावित्र्य उत्पन्न होण्यास कारणीभूत ठरते; आणि म्हणूनच या प्रेमामुळे साधकाचे जितके शुद्धीकरण घडून येते तितके दुसऱ्या कशानेही घडून येत नाही. साधक आपल्या प्रियतमासाठी सर्वस्व-समर्पण करण्यास सदैव तयार असतो, आणि त्यामुळे कोणताही त्याग त्याला फारसा अवघड वाटत नाही. त्याचे सर्व विचार त्याच्या स्वतःपासून दूर खेचले जाऊन ते केवळ दैवी प्रियतमावर केंद्रित होतात. सतत वाढत जाणाऱ्या या प्रेमातून निर्माण होणाऱ्या तीव्र आर्ततेमुळे अखेरीस तो आपल्या संकुचित 'मी'पणाच्या शृंखला तोडून टाकतो आणि आपल्या दैवी प्रियतमाशी एकरूप होऊन जातो. ही प्रेमाची कृतार्थता होय. अशा रीतीने प्रेमाला जेव्हा आपली सफलता गवसते तेव्हा ते दैवी स्वरूप धारण करते.

## दैवी प्रेम व मानवी प्रेम

दैवी प्रेम हे गुणवत्तेच्या दृष्टीने मानवी प्रेमापेक्षा जात्याच भिन्न असते. मानवी प्रेम हे एकत्वातील विविधतेवर असते, तर दैवी प्रेम विविधतेमागील एकत्वावर असते. मानवी प्रेम हे असंख्य गुंतागुंतींना व पेचप्रसंगांना कारणीभूत होते, उलट दैवी प्रेमाची परिणती एकात्मतेत व स्वातंत्र्यात होते. दैवी प्रेमात सगुण-साकार व निर्गुण-निराकार या दोन्ही अंगांचा पूर्ण समतोल साधलेला असतो, उलट मानवी प्रेमात या दोन्ही अंगांचा आळीपाळीने वरचष्मा असतो. जेव्हा मानवी प्रेमात सगुण-साकार अंगाचा वरचढपणा असतो, तेव्हा ते इतर साकार रूपांच्या आंतरिक मूल्यांकडे

पूर्णपणे काणाडोळा करते. पण जेव्हा कर्तव्यपालनासारख्या बाबतीत प्रेमाच्या निर्गुण-निराकार स्वरूपाचा मुख्यत्वेकरून पगडा असतो, तेव्हा ते माणसाला थंड्या वृत्तीचा, ताठर व यांत्रिक बनविते. कर्तव्यपालनाची भावना ही माणसाच्या ठिकाणी आचरणावरील बाह्य दडपणातून उत्पन्न होत असते, परंतु दैवी प्रेमात अनिर्बंध स्वातंत्र्य व असीम उत्स्फूर्तता वास करीत असतात. मानवी प्रेमाचे सगुण-साकार अंग घ्या, किंवा निर्गुण-निराकार अंग घ्या, दोन्ही बाबतीत ते मर्यादित असते; याउलट सगुण-साकार व निर्गुण-निराकार या दोन्ही अंगांची पूर्ण समरसता साधणारे दैवी प्रेम हे त्याच्या मूळ स्वरूपात व अभिव्यक्तीत अमर्याद असते.

## दैवी प्रेमात प्रियकराची प्रियतमाशी एकरूपता

अगदी सर्वोच्च प्रतीच्या मानवी प्रेमालासुद्धा व्यक्तीच्या स्वभावाच्या मर्यादा पडतात, कारण हा स्वभाव अगदी ज्ञानाच्या सातव्या भूमिकेपर्यंत [पायरीपर्यंत] टिकून राहतो. दैवी प्रेम हे मात्र वैयक्तिक मन नाहीसे झाल्यावरच उदय पावत असल्याने, ते मानवी स्वभावाच्या जोखडापासून मुक्त असते. मानवी प्रेमात प्रियकर व प्रियतम यांच्यातील द्वैत-भावना कायम चालू राहते, परंतु दैवी प्रेमात प्रियकर व प्रियतम दोन्ही [परस्परांत विलीन होऊन] एक होऊन जातात. या टप्प्यावर, साधक हा मायेच्या द्वैताचे क्षेत्र ओलांडून बाहेर पडलेला असतो व ईश्वराशी तादाम्य पावलेला असतो, कारण दैवी प्रेम हेच साक्षात् ईश्वर होय. प्रियकर व प्रियतम एक होऊन जातात, तोच शेवट होय आणि तोच आरंभही होय.

## विश्वसृष्टीचे अस्तित्व प्रेमासाठी

ही विश्वसृष्टी जी अस्तित्वात आली ती प्रेमासाठी, आणि चालू राहणार आहे तीदेखील प्रेमासाठीच. ईश्वर मायेतील द्वैताच्या क्षेत्रात अवतार घेतो, कारण प्रियतम व प्रियकर हा वरवर दिसून येणारा भासमान द्वैतभाव अखेरीस त्याला स्वतःच्या ईश्वरत्वाचा जाणीवपूर्वक आनंद लुटण्यास साहाय्यभूत ठरत असतो. मायासृष्टीतील द्वैतभावाच्या ताणतणावांमुळे प्रेमाच्या विकासाला निश्चित स्वरूप व आधार प्राप्त होतात. आपली प्रेमलीला अखंड चालू ठेवण्यासाठी परमात्म्याला बहुसंख्य जीवात्म्यांच्या रूपाने भासमान भेदाभेद सहन करणे भाग पडते. हे जीवात्मे म्हणजे त्याची स्वतःचीच साकार रूपे असून, त्यांच्या संबंधात तो दैवी प्रियतम व दैवी प्रियकर ही

दुहेरी भूमिका एकाच वेळी वठवीत असतो. [एकीकडे] दैवी प्रियतम म्हणून तोच त्यांच्या गुणग्राहकतेचे खरे व अंतिम उद्दिष्ट बनून राहतो. [दुसरीकडे] दैवी प्रियकर या नात्याने तो त्यांना परत स्वतःकडे खेचून घेत त्यांचा खराखुरा व अंतिम तारणहार बनतो. अशा रीतीने, द्वैतातील ही अखिल विश्वसृष्टी हा जरी केवळ मायेचा आभास असला, तरी तो आभासदेखील एका महत्त्वाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अस्तित्वात आलेला असतो.

**प्रेमाची चैतन्यगाथा**

प्रेम हे द्वैतातील विश्वसृष्टीमागील ईश्वराच्या एकात्मतेचे प्रतिबिंब होय. अखिल विश्वसृष्टीचे सार त्याच्यात सामावलेले आहे. जर जीवनातून प्रेम हद्दपार झाले तर जगातील सर्व आत्मे एकमेकांना पूर्णपणे पारखे होतील, आणि मग अशा प्रेमशून्य जगात शक्य होतील ते केवळ कृत्रिमता व यांत्रिकपणा यांच्यावर आधारलेले नाते-संबंध व परस्पर-व्यवहार. जीवात्म्यांमधील परस्पर-व्यवहारांना व नाते-संबंधांना जे महत्त्व प्राप्त होते ते केवळ प्रेमामुळेच. द्वैती विश्वसृष्टीतील सर्व घडामोडींना अर्थ व मौलिकता प्राप्त होतात तीदेखील प्रेमाच्या योगानेच. पण ज्यावेळी प्रेम द्वैतातील विश्वसृष्टीला अर्थ प्राप्त करून देत असते, त्याच वेळी ते द्वैतासमोर एक आव्हानही खडे करून ठेवते. प्रेम हे जसजसे बलसंपन्न बनत जाते तसतसे ते सर्जनशील स्वरूपाची अस्वस्थता निर्माण करते, आणि त्यातूनच अशा प्रकारच्या आध्यात्मिक चैतन्याला चालना देणारे प्रमुख शक्ति-केंद्र बनते की, ज्यामुळे [मानवी] जाणिवेला अस्तित्वामागील मूळच्या एकात्मतेचा साक्षात्कार प्राप्त करून देण्यात ते यशस्वी होते.